# <u>वर्धा जिल्ह्यातील ४२ रेती घाटांची पर्यावरण विषयक लोकजनसुनावणीचे इतिवृत्त</u>
# <u>दि.२६/०६/२०२५.</u>

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ नुसार जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांनी वर्धा जिल्ह्यातील एकुण ४२ रेतीघाट **आर्वी तालुक्यातील** सालफळ-२ (३.५० हेक्टर), सायखेडा (२.४० हेक्टर), दिघी-वाडगांव-२ (१.५० हेक्टर), **तालुका देवळी** येथील टाकली चना-१ (१.२३ हेक्टर), सोनेगांव बाई-२ (१.२० हेक्टर), तंभा-१ (४.० हेक्टर), तंभा-२ (१.२५ हेक्टर), हिवरा का-१ (१.५० हेक्टर), बाबुलगांव बोबडे (१.०५ हेक्टर), निमगव्हाण (१.५० हेक्टर), वाघोली (१.७५ हेक्टर), आपटी-१ (१.०५ हेक्टर), आपटी-२ (१.१२ हेक्टर), सावंगी येंडे (१.२० हेक्टर), **तालुका हिंगणघाट** येथील चिकमोह-२ (१.८० हेक्टर), टेम्भा-२ (१.२० हेक्टर), नांदरा(रिठ)-२ (१.४० हेक्टर), सावंगी (रिठ)-२ (१.०५ हेक्टर), कुरण (रिट)-२ (१.०८ हेक्टर), दिवरी-पिपरी-२ (३.० हेक्टर), सती-१ (१.० हेक्टर), डोरला-२ (१.०५ हेक्टर), धोची-२ (१.१६ हेक्टर), शेकापूरबाई-२ (१.६० हेक्टर), येळी-२ (२.४५ हेक्टर), सोनेगांव(ध) (१.६० हेक्टर), पार्डी नागजी (१.० हेक्टर), **तालुका समुद्रपूर** येथील मांडगांव-१ (२.५० हेक्टर), मांडगांव-४-खुनी (१.०६ हेक्टर), शिवनी-१ (१.०५ हेक्टर), सेवा-२ (१.६८ हेक्टर), माणगांव (१.०५ हेक्टर), मेणखत (१.२३ हेक्टर), वाकसूर (१.५० हेक्टर), करडा (१.१४ हेक्टर), **तालुका आष्टी** येथील टेकोडा (१.०२ हेक्टर), इस्लामपूर (१.०८ हेक्टर), गोदावरी (१.०४ हेक्टर), वाघोली (१.०६ हेक्टर), अंतोरा (१.५० हेक्टर), दलपतपूर (१.२५ हेक्टर), चिंचोली (१.२५ हेक्टर) रेतीघाटाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी करीता दि. २३/०५/२०२५ रोजी अर्ज प्राप्त झाला होता.

सदर प्रस्तावानुसार वर्धा जिल्ह्यातील ४२ प्रस्तावित रेतीघाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २६/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे श्रीमती. आर. वान्मथी सी.,भाप्रसे जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या होत्या व श्री.किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत **(सहपत्र-१).**

<u>**प्रयोजन व कार्यपध्दती**</u>

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा. जिल्हाधिकारी, वर्धा व अध्यक्षा, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २५/०५/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले नाही. मंडळाचा आदेश क्र. ई-०३/२०२२ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-250530-FTS-0079 dtd. 30/05/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत वर्धा जिल्ह्यातील ४२ रेतीघाटाचे सादरीकरण केले. सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**सादरीकरणा दरम्यान दिलेली प्रस्तावित उत्खनन पध्दत:-**

१. मातीचे ढिगारा किंवा मातीचे उत्खनन करता येणार नाही.
२. रेती उत्खनन टोपले, पावडे द्वारे मजुरांकडुन करण्याचे प्रस्तावित.
३. उचललेली रेती ट्रॅक्टरद्वारे वाहतुक करण्याचे प्रस्तावित.
४. ट्रॅक्टर वगळता कोणतही अवजड व यांत्रिक मशिनरी उपयोगात आणता येणार नाही.
५. उत्खननाकरीता ठरवून दिलेला कालावधी हा दि. १० जून ते ३० सप्टेंबर पर्यंतचा मानसुन कालावधी वगळता जास्तीत जास्त १ वर्षाकरीता प्रस्तावित आहे.
६. रेती उचलणे किंवा रेती वाहतुकी दरम्यान एकही झाड तोडण्याची परवानगी नाही.
७. एकही रेती घाट हा माननीय राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयानुसार नदी प्रतीबंधित क्षेत्रात प्रस्तावित नाही, असे नमुद आहे.
८. रेतीची क्षमतेपेक्षा जास्त वाहतुक होऊ नये म्हणून ट्रॅक्टर ट्रॉली वर आकारमानाचे रंगीत पट्टे रंगविण्यात येतील, असे नमुद आहे
९. तसेच रेती वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉली ला विशिष्ट रंग देण्याचे प्रस्तावित करता येईल, असे नमुद आहे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. मनोज वाटाणे, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | वाळुची वाहतुक ही ताडपत्रीने आच्छादन करून केली जाते कां, ज्या वाहतुक धारकांकडुन ताडपत्रीने आच्छादन केल्या जात नाही, अशा किती वाळु वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कार्यवाही करण्यात आली. | वाळुच्या वाहनांवर वाहतुकीसाठी जी.पी.स. यंत्रणा लावण्यात येते. तसेच वाळूच्या वाहनांची शासनामार्फत तपासणी करण्यात येते व दोषी आढळलेल्या वाहन धारकांवर कार्यवाही करण्यात येते. आतापर्यंत २१७ वाहनधारकांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| २ | निविदा धारक यांच्यामार्फत पर्यावरण विषयक व्यवस्थापन अहवाल सादर केल्या जातो का व त्याचे पालन केले जाते काय. | याबाबत पर्यावरण कार्यकारी सारांशामध्ये अट घालुन दिलेली आहे. |

१) श्री. अश्विन नगरारे, हिवरा (कावरे), जि.वर्धा

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रेतीच्या जड वाहनाच्या गावांतील मुख्य रस्ते खराब झालेले आहेत. त्यामुळे शाळेकरी मुले, वयोवृध्द व्यक्ती व शेतकऱ्यांनाही त्रास होतो. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

**श्रीमती.हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी तथा सदस्या लोकसुनावणी समिती.**

यांनी प्रकल्प प्रवर्तकाला सांगितले की, वाळुची वाहतुक गावांतुन न करता गावाच्या बाहेरून करावी, जेणेकरून नागरीकांना धुळीचा त्रास होणार नाही. तसेच लोकवस्तीपासुन रेती डेपोचे अंतर किती आहेत.

यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, वाळुची वाहतुक ही गावांबाहेरून व पर्यायी मार्गाने करण्यात येईल. तसेच रेती वाहनांची वाहतुक ही थेट रेती घाट ते ग्राहकापर्यंत राहील. येथे रेतीचे डेपो नाही.

**मा. जिल्हाधिकारी, वर्धा व अध्यक्ष लोकसुनावणी समिती.**

यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद करण्यात आली आहे, असे सांगितले व सदर प्रकल्पाला समर्थन देण्याचे आव्हान केले. तसेच उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्षा यांच्या परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(किशोर पुसदकर)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२ यांचे प्रतिनिधी

03/07/25

(वान्मथी सी, भा.प्र.से)
अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
जिल्हाधिकारी, वर्धा